**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language**
**Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2021: 7.27**
https://www.srjis.com/issues_data/223
***PEER REVIEWED, REFEREED & INDEXED JOURNAL OCT-NOV 2023, Vol-11/60***
https://doi.org/10.5281/zenodo.10473178

# ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा तुलनात्मक अभ्यास

**डॉ. मनोज कांता बोराटे**
*प्राचार्य शिक्षणशास्त्र महाविद्यालय सासवड, पुणे .*

**सारांश**

प्रस्तुत संशोधनामध्ये ग्रामीण भागात माध्यमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या एकूण 70 विद्यार्थ्यांची मानसिक आरोग्य चाचणी सोडवून घेतली. चाचणी मधील प्रतिसादावरून प्रस्तुत चलांच्या सद्यस्थितीचा अभ्यास केला आहे. मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष मांडले आहेत.

**संकेत शब्द :** *मानसिक आरोग्य*

**समस्या विधान : ( Statement of Problem ):** ग्रामीण भागात माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा तुलनात्मक अभ्यास करणे

**प्रस्तावना** : **( Introduction ):** व्यक्तीच्या मानसिक विकासाची सुरुवात कुटुंबात होते. कुटुंबच ही व्यक्तीच्या जीवनातील पहिली सामाजिक संस्था आहे. म्हणून याच ठिकाणी मानसिक स्वास्थ्याची पायाभरणी चांगल्या पद्धतीने होणे आवश्यक असते. कुटुंब आणि त्यातील सदस्य यांच्याकडून मुलाला जे अनुभव मिळतात यावर त्याची स्वीकृती, प्रेमाची व सुरक्षितेचे भावना अवलंबून असते. कुटुंबात व्यक्तीला अनेक घटना व प्रसंग अनुभवायला येतात. त्या त्यावेळी व्यक्तीला स्वतःच्या क्षमता व योग्यता सिद्ध करण्याची संधी मिळते. व्यक्ती जेव्हा स्वतःच्या क्षमतांचा उपयोग करून योग्य प्रकारे कृती करू शकते. तेव्हा तिच्या मनात स्वतःबद्दल

*Copyright@2023 Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

योग्यतेचा भाव व आत्मविश्वास निर्माण होतो. मुलांमध्ये स्वावलंबन आत्मनियंत्रण तसेच स्वतःच्या वर्तनाची दिशा ठरवण्याचे स्वातंत्र्य व निर्णय घेण्याची क्षमता ज्या प्रमाणात व ज्या पद्धतीने विकसित होते त्यावर व्यक्तीची वास्तववादी व धनात्मक स्वत्व कल्पना निर्माण होते. वाढत्या वयाबरोबर व्यक्ती स्वतःच्या व सामाजिक जबाबदाऱ्या किती कौशल्याने पार पाडते व त्यामुळे सामाजिक मान्यता मिळते हे ही व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. सामाजिक दृष्ट्या योग्य अपेक्षित वर्तन प्रकार शिकण्यावर व्यक्तीच्या कौटुंबिक अनुभवांचा परिणाम होतो. मुलांचे शारीरिक, मानसिक, भावनिक व सामाजिक सर्व प्रकारचे वर्तन इतरांच्या वर्तनाच्या निरीक्षणातून त्यांच्या आकलनातून व अनुकरणातून विकसित होत असते.

मानसिक आरोग्याची व्याख्या 1) " मानसिक अनारोग्याचा अभाव उत्पादकता धनात्मक अभिवृत्ती आणि समायोजनाची तयारी या गुणांनी युक्त असे वर्तन म्हणजे मानसिक आरोग्य होय" जागतिक आरोग्य संघटना 2) "मन निरोगी व विकसनशील ठेवणे म्हणजे मानसिक आरोग्य होय" **लेविन** मानसिक आरोग्यामध्ये एखाद्याचे मानसिक भावनिक सामाजिक कल्याण असते. एखाद्याचे मानसिक आरोग्य त्याच्या विचार, भावना आणि कृतीवर परिणाम करते. त्यांना हाताळतो विचार कसा करतो. आणि इतरांशी संबंधित असतो. हे निर्धारित करण्यात देखील हे मदत करते. मानसिक आरोग्य एखाद्या दैनंदिन जीवनातील क्रिया कला असे. संबंधित शारीरिक आरोग्यावर परिणाम करते. व्यक्तीच्या आयुष्यात मानसिक आरोग्य चांगली भूमिका पार पाडते. कारण जीवन कक्षेमध्ये मानसशास्त्राने सांगितलेल्या अवस्था बाल्यावस्थेपासून प्रौढावस्थेपर्यंत प्रत्येक अवस्थेत हे मानसिक आरोग्य संतुलित असेल तर त्याचा चांगला परिणाम व्यक्तीच्या वैयक्तिक, सामाजिक व व्यावसायिक आयुष्यावर झालेला दिसून येतो. तसेच मानसिक आरोग्य चांगले नसल्यास त्याचा परिणाम मनस्थितीवर व वर्तनावर होतो. यामुळे विचारांची पद्धत बदलते जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. व्यक्ती आव्हानांना सामोरे जाणे टाळते. जबाबदारी घेत नाही. त्यामुळे मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**सैद्धांतिक पार्श्वभूमी** : **( Historical Background )**

प्रस्तुत संशोधनासाठी खालील सारणी क्रमांक 1 मधून मानसिक आरोग्य विषयी तज्ञांची मते मांडली आहे.

**सारणी क्रमांक 1:** मानसिक आरोग्य याविषयी तज्ञांची मते

| अ.क्र. | सिद्धांताचे जनक | सिद्धांतातील उपयुक्तता | उपयोजन |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | रोझेनॉफ | यांच्या मते चांगल्या मानसिक आरोग्यासाठी आर्थिक स्थिरता गरजेचे आहे. | व्यावसायिक कौशल्य व व्यावसायिक शिक्षण |
| 2 | फिलिप ह्यारिमन | यांनी स्वास्थ्यवर्धक सवयींना महत्त्व दिलेले दिसून येते. | आरोग्य शिक्षण |
| 3 | रुझवेल्ट 1937 | यांनी आत्म गौरव याला जास्त महत्त्व दिले आहे हे मानसिक आरोग्यासाठी महत्त्वाचे सांगितले आहे. | शारीरिक व कला शिक्षण |
| 4 | फ्राईड | चांगल्या मानसिक आरोग्यातून समतोल वर्तन घडते त्यासाठी अंतर्गतसमीक्षाला महत्व दिले. | ध्यान धारणा प्राणायाम |
| 5 | होम्स व रेह 1967 | मानसिक आरोग्यासाठी सामाजिक पुनर्समायोजनाला महत्त्व दिले आहे. | समाजसेवा शिबिर |
| 6 | कोबास 1979 | मानसिक आरोग्यासाठी कणखर व्यक्तिमत्वाची संकल्पना मांडली आहे यात आत्मकेंद्रीय नियंत्रण बांधिलकी यांना महत्त्व दिले आहे. | वाचानोपचार |
| 7 | गोल्डस्टीन | व्यक्तिमत्त्वाचे एकात्मक संघटन हे मानसिक स्वास्थ्याचे लक्षण सांगितले आहे. | सामाजिक सांस्कृतिक कार्यक्रम |
| 8 | जागतिक आरोग्य संघटना डब्ल्यू एच ओ | मानसिक आरोग्यातील जैविक व सामाजिक पैलूंना महत्त्व दिले आहे. | आरोग्य शिक्षण |

**संशोधनाचे महत्त्व ; ( Importance of Research )**

व्यक्ती दैनंदिन जीवन जगत असताना कुटुंब मित्रपरिवार समाज यांच्याबरोबर सतत संवाद साधत असते जर व्यक्ती अती महत्वकांक्षी असेल तर अपेक्षापूर्ती न झाल्यास वर्तनात बिघाड होण्याची शक्यता असते. अशावेळी या अभ्यासातून महत्वकांक्षेविषयी त्यांना जाणीव करून

देता येते. तसेच बऱ्याच व्यक्तींमध्ये जीवनातील उद्दिष्ट व गरजांमध्ये समन्वय साधता येत नाही. मानसिक आरोग्याच्या अभ्यासाने याचे महत्त्व स्पष्ट करून सांगता येते. काही व्यक्तींना सतत अकारण भीती, दडपण, चिंता व ताण जाणवतो या सर्वातून मुक्त होऊन संतुलित व्यक्तिमत्त्वासाठी आणि आदर्श वर्तनासाठी मानसिक आरोग्याच्या अभ्यासाचे महत्त्व आपणास सांगता येते. मानसिक आरोग्य याच्या अभ्यासामुळे किंवा जाणिवेमुळे किंवा प्रबोधनामुळे व्यक्ती आपले व पर्यायाने इतरांचे आयुष्य गतिमान करून समाजात एक आदर्श निर्माण करत असते. अशा व्यक्तीकडे जीवनातील उत्साह जास्त जाणवतो. आणि म्हणून मानसिक आरोग्याच्या अभ्यासाचे महत्त्व आपणाला सांगता येते. सामाजिक संबंध हा मानसिक आरोग्यातील महत्त्वाचा घटक होय. चांगल्या सामाजिक संबंधांमुळे मानसिक स्वास्थ्य चांगले राहते. सामाजिक संबंध बिघडल्यास त्याचा मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. किंबहुना तणाव निर्माण होतो. सामाजिक संबंध हे मानसिक आजाराला सुद्धा कारणीभूत ठरतात. प्रत्येक व्यक्तीचा व्यक्ती म्हणून आदर करणे, इतरांना समजावून घेण्याची क्षमता वाढवणे, इतरांशी सतत संप्रेषण ठेवणे, सामाजिक शक्तींचा व अधिकारांचा सत्करमासाठी उपयोग करणे, स्वतःची प्रतिमा चांगली ठेवणे, अंतर व्यक्ती संबंधात स्वतःला समजावून घेणे या गोष्टी महत्त्वाच्या म्हणून सांगता येतात. या सर्व पार्श्वभूमीवर मानसिक आरोग्याच्या अभ्यासाचे महत्त्व आपणाला विशद करता येते.

**संबंधित संशोधनाचे सिंहलोकन : ( Review of Related Literature )**

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील संदर्भ देता येतात नूतन चव्हाण (2018) शिवानी घोष (1989) कुमार विद्या (1991) मुरलीधरण आर (1993) या सर्वांनी प्रस्तुत चलाशी संबंधित संशोधने केली आहेत त्याचे सामान्य निष्कर्ष पुढीलप्रमाणे

1 मुला-मुलींमध्ये मानसिक आरोग्याबाबत भेद दिसून आला.

2 पालकांचा व्यवसाय त्यांचे शिक्षण आणि किशोर यांचे मानसिक आरोग्य यांच्यात धनसंपन्न दिसून आला.

**संशोधनाची उद्दिष्टे : ( Objective of Research )**

1 ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचे मापन करणे.

2 ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या मानसिक आरोग्याचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**गृहीतक** : **( Assumption ):** 1 विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या मानसिक आरोग्यामध्ये भेद दिसून येतो.

**संशोधन प्रश्न** : **( Research Question ):** ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या मानसिक आरोग्यात फरक असतो का ?

**संशोधन पद्धती** : **( Research Methodology ):** प्रस्तुत संशोधन हे सद्यस्थितीशी संबंधित असल्याने सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग केला आहे.

**माहिती संकलनाचे साधन** : **( Tool of information collection ):** प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी पुढील चाचणीचा उपयोग केला आहे. हे सारणी 2 वरुन स्पष्ट केले आहे.

**सारणी क्रमांक 2:** माहिती संकलनाचे साधन

| अ.क्र. | रचनाकार | साधन | साधने निवडीच्या समर्थन |
|---|---|---|---|
| 1 | डॉ. जगदीश आणि श्रीवास्तव | मानसिक आरोग्य चाचणी | उपघटकांचा व भाषा यांचा विचार केला आहे |

**माहिती संकलन पद्धती** : **( Method of Information Collection ):** चाचणी द्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण खालील संख्याशास्त्रीय साधनांचा उपयोग करून केला आहे 1) शेकडेवारी 2) मध्यमान 3) प्रमाण विचलन 4) टी  परीक्षण यांचा उपयोग करून माहितीचे विश्लेषण केले आहे.

**जनसंख्या** : **( Population ):** प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासाची जनसंख्या ही फलटण तालुक्यातील ग्रामीण भागातील माध्यमिक स्तरावर इयत्ता नववीच्या वर्गात शिक्षण घेणारे 279 विद्यार्थी ही संख्या होय.

**नमुना निवड** : **( Sample ):** प्रस्तुत संशोधनात फलटण तालुक्यातील ग्रामीण भागात माध्यमिक स्तरावर इयत्ता नववीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या एकूण 70 विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य चाचणी घेतल्या आहेत.

**नमुना निवड पद्धती** : **( Sampling ):** प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासासाठी प्रासंगिक नमुना निवड पद्धतीचा उपयोग केला आहे. जे उस्फूर्तपणे चाचणी सोडवण्यास तयार झाले त्यांचीच निवड प्रस्तुत संशोधनासाठी केली आहे.

**कार्यपद्धती** : **( Procedure ):** प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्याच्या चाचण्या दिल्या. नंतर योग्य सूचना देऊन त्या सोडवून घेतल्या. त्यानंतर फलिताची चर्चा पुढील प्रमाणे केली आहे.

**फलिते : ( Out come ):** चाचणीवरून मिळालेल्या माहितीचे अर्थनिर्वचन उद्‌दिष्टानुसार पुढील सारणीच्या माध्यमातून मांडले आहे.

**सारणी क्रमांक 3:** विद्‌यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचे मापन

| अ.क्र. | घटक | उत्कृष्ट पातळी | सरासरी पातळी | निम्न पातळी | एकूण प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मानसिक आरोग्य | 12 | 36 | 22 | 70 |
| 2 | शेकडा प्रमाण | 17.14% | 51.42 % | 31.42 % | 100 % |

**चर्चा : ( Discussion ):** एकूण 70 विद्‌यार्थ्यांची चाचणी घेतल्यानंतर वरील प्रमाणे फलिते दिसून आली. मानसिक आरोग्याबाबतीत उत्कृष्ट पातळीमध्ये 12 म्हणजे 17 % विद्‌यार्थी व सरासरी पातळी मध्ये 36 विद्‌यार्थी म्हणजे 51% विद्‌यार्थी तर निम्न पातळीमध्ये 22 विद्‌यार्थी म्हणजे 31 टक्के विद्‌यार्थी दिसून येतात.

**सारणी क्रमांक 4:** विद्‌यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा तुलनात्मक अभ्यास

| अ. नं. | घटक | विद्‌यार्थी | मध्यमान | प्रमाण विचलन | प्राप्त टी | प्रमाणीत टी | सार्थकता स्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मानसिक आरोग्य | विद्‌यार्थीनी 35 | 45.18 | 3.78 | 0.66 | 1.66 | 0.05 |
| | | विद्‌यार्थी 35 | 30.86 | 2.90 | | | |

**चर्चा : ( Discussion ):** वरील सारणीच्या निरीक्षणावरून मानसिक आरोग्याच्या बाबतीत विद्‌यार्थी व विद्‌यार्थिनी यांची तुलना केली असता प्राप्त मूल्य 0.66 हे 0.05 या सार्थकता स्तरावरील प्रमाणित टी मूल्यापेक्षा कमी असल्याने ते सार्थ नाही असे सांगता येते. म्हणजेच विद्‌यार्थी व विद्‌यार्थिनींच्या मानसिक आरोग्याबाबत लक्षणीय फरक दिसून येत नाही.

**निष्कर्ष : ( Conclusion )**

1. ग्रामीण भागात माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याच्या बाबतीत सरासरी वर्गवारी मध्ये 36 इतके विद्यार्थी दिसून आले. हे प्रमाण जास्त असल्याचे सांगता येते. (सारणी 3 वरून)
2. ग्रामीण भागात माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या मानसिक आरोग्यामध्ये सार्थ फरकनसल्याचे आढळून आले. (सारणी 4 वरून)

**संदर्भ ग्रंथ**

कुलकर्णी क .र. मराठी विश्वकोश खंड अठरा मुंबई महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ

पंडित महादेव शास्त्री जोशी (1926) भारतीय संस्कृती कोश

किरण नागतोडे नैतिक मूल्यशिक्षण पुणे डायमंड पब्लिकेशन

रमेश पानसे शिक्षण परिवर्तनाची चळवळ

नूतन चव्हाण ऑक्टोबर 2011 डिसेंबर 2011 शिक्षणातील मर्मदृष्टी

मराठी मानसशास्त्र परिषद पुस्तिका.

मानसिक आरोग्य चाचणी .

**Cite Your Article**

Manoj Kanta Borate. (2024). Gramin Bhagatil Madhymik Satravaril Vidyarthayncha Mansik Arogycha Tulnatmak Abhyas. Scholarly Research Journal for Humanity Science & English Language, 11(60), 357–363. https://doi.org/10.5281/zenodo.10473178